साप्ताहिक

# परळी परिसर

शालेय स्टेशनरी व विविध प्रकारच्या आकर्षक छपाईसाठी...
न्यू सुधांशू प्रिंटर्स
श्रीनाथ चित्रमंदिरच्या मागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, Mob.9881244075
कापडी पिशव्या छापून मिळतील.

* परळी वैजनाथ * सोमवार, दि. ०२ सप्टेंबर २०२४ * पाने-४ * २/- ₹ www.parliparisar.com

## पावसाचा जोर कमी होताच शेती पिकांचे पंचनामे-ना.धनंजय मुंडे

मुंबई (बातमीदार):- संपूर्ण बीड जिल्ह्यात ३१ ऑगस्ट पासून ते आतापर्यंत सातत्याने सर्वदूर पाऊस पडत असून जिल्ह्यातील जवळपास सर्वच जलाशय तुडुंब भरून नदी-नाले खळखळून वाहू लागले आहेत. जिल्ह्यावरील जलसंकट दूर झाल्याची बातमी जरी आनंददायक असली, तरी सततच्या पावसाने अतिवृष्टी व काही ठिकाणी पुराचा धोका निर्माण झाला असून त्यामुळे खरीप हंगामातील शेती पिके धोक्यात येण्याची शक्यता आहे. तर काही महसूल मंडळांमध्ये २४ तासांमध्ये अतिवृष्टीच्या निकषांप्रमाणे किंवा त्यापेक्षा अधिक पाऊस पडला असून, राज्य शासनाच्या महसूल विभागाने यापूर्वीच काढलेल्या आदेशाला अनुसरून महसूल व कृषी विभागाने पावसाचा जोर कमी होताच शेती पिकांच्या तसेच घरांच्या पडझडीच्या आदी नुकसानीचे तातडीने वस्तुनिष्ठ पंचनामे करावेत व शेती पिकांच्या ३३% च्या मर्यादेपेक्षा जास्त नुकसानीचे अहवाल राज्य शासनाकडे मदतीच्या मागणीसह तातडीने पाठवावेत असे निर्देश जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी जिल्हा प्रशासनाला दिले



आहेत.

बीड जिल्ह्यातील बहुतांश शेतकऱ्यांनी खरीप हंगामात एक रुपयात पिक विमा योजनेत सहभाग घेतला असून आपल्या शेती पिकांच्या झालेल्या नुकसानीची माहिती विमा कंपनीच्या नियमानुसार विमा कंपनीला देखील निर्धारित वेळेत कळवावी, जेणेकरून बाधित शेतकऱ्यांना पीक विम्याचे ही संरक्षण लागू राहील, असेही आवाहन पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी केले आहे.

दरम्यान सध्या जिल्ह्यात सर्वदूर सुरू असलेल्या पावसामुळे जिल्ह्यातील जवळपास सर्वच लहान मोठे जलाशय पूर्ण क्षमतेने भरले असून त्याउपर नद्यांमधून व नाल्यांमधून पाणी वाहत आहे. पावसाचा जोर आणखी पुढील २४ तास जर इतकाच प्रखर राहिला तर काही नद्या धोक्याची पातळी ओलांडू शकतात व त्यामुळे नदीकाठच्या गावांना किंवा नदीकाठच्या शहर वस्त्यांना देखील पुराचा धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे विशेष करून जलाशय व नदीकाठच्या गावच्या नागरिकांनी सतर्क रहावे या आवाहनासह नदीच्या पूर नियंत्रण रेषेच्या क्षेत्रात राहणाऱ्या नागरिकांचे इतरत्र स्थलांतर करण्यात यावे अशा पद्धतीच्या सूचना देखील धनंजय मुंडे यांनी जिल्हा प्रशासनाला केल्या आहेत. ***



## ऋण...

तुझ्या शेतात राबून
माझी सरली हयात
नको करू हेटाळणी
आता उतार वयात....
नाही राजा ओढवत
चार पाउल नांगर
नको बोलूस वंगाळ
नको म्हणूस डंगर...
माझ्या ऐन उमेदीत
माझी गाईलीस ओवी
नको चाबकासारखी
आता फटकारू शिवी....
माझा घालवाया शीण
तेव्हा चारलास गूळ
कधी घातलीस झूल
कधी घातलीस माळ...
अशा गोड आठवणी
त्यांचे करीत रवंथ
मला मरण येऊ दे
तुझे कुशल चिंतीत...
मेल्यावर तुझे ठायी
पुन्हा ए कदा रुजू दे
माझ्या कातड्याचे जोडे
तुझ्या पायात वाजू दे..!

– श्री.दि.इनामदार

## प्रदीप कुलकर्णी साहित्यरत्न पुरस्काराने सन्मानित



माजलगाव (प्रतिनिधी )- येथील पत्रकार तथा साहित्यिक प्रदीप कुलकर्णी यांना एस फोर सोलुशन या संस्थेच्या वतीने साहित्यरत्न पुरस्कार जाहीर करण्यात आला होता. या पुरस्काराचे वितरण दिनांक ३० ऑगस्ट रोजी पुणे येथील एस एम जोशी सभागृहात मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्या सहकारी बँकेचे संचालक डॉक्टर गौतम बेंगाळे हे होते. तर कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून दैनिक केसरीचे वृत्तसंपादक स्वप्निल पोरे, ज्येष्ठ अध्यात्मिक समुपदेशक ब्रह्म कुमारी शामला दीदी, दैनिक आज का आनंदच्या वृत्तसंपादक प्राध्यापिका मिलन मेत्रे, दिग्दर्शक चित्रपट नाटक अभिनेते सुनील नाईक, शैक्षणिक मार्गदर्शक करण भिसे आदी मान्यवर उपस्थित होते. प्रारंभी प्रतिमा पूजन करण्यात आले . व कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. सर्व मान्यवरांचे स्वागत व प्रास्ताविक एस फोर सोल्युशन चे मुख्य प्रवर्तक शैलेश दादा कुलकर्णी यांनी केले.

या कार्यक्रमात काव्य धारा स्पर्धेतील दहा विजेत्या कवींना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. तर अध्यात्मिक लेखन स्पर्धेतील दहा स्पर्धकांचाही या समारंभात गौरव करण्यात आला . त्याचबरोबर साहित्य रत्न २०२४ पुरस्काराने दहा साहित्यिकांना सन्मानित करण्यात आले. यामध्ये माजलगाव चे ज्येष्ठ संपादक तथा साहित्यिक प्रदीप कुलकर्णी यांनाही हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. साहित्यरत्न पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे सोशल मीडियातून तसेच फोन द्वारे अनेकांनी अभिनंदन केले असून त्यांना पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा प्रदान केल्या आहेत. हा पुरस्कार म्हणजे माझ्या आयुष्यातील सर्वोच्च आनंदाचा क्षण असून हा आनंदाचा क्षण मी अनमोल ठेवा म्हणून माझ्या हृदयात कायम जपेल असे प्रतिपादन प्रदीप कुलकर्णी यांनी केले असून एस फोर सोलुशन चे त्यांनी मनापासून आभार मानले आहेत. **

## परळी-सिरसाळा मार्गावर पर्यायी पूल वाहून गेल्याने पुन्हा वाहतूक बंद



परळी वैजनाथ, (बातमीदार):- परळी-बीड राष्ट्रीय महामार्गाच्या रस्ता रुंदीकरणाचे काम सध्या सुरू असून या रस्त्यावर परळी तालुक्यातील पांगरी जवळील पर्यायी पूल वाहून गेला होता. आता पुन्हा बनवलेल्या तात्पुरत्या पुलावरून पाणी वाहत आहे. तर सेलू फाट्यावरील तसेच वडखेल जवळील खंडोबा माळाच्या बाजुचा पर्यायी पुल जोरदार पावसाने आलेल्या पुरामुळे वाहून गेल्याने या मार्गावरील वाहतूक रविवारी (दि.१) पुन्हा बंद पडली आहे.


परळी-बीड राष्ट्रीय महामार्गाच्या रुंदीकरणाचे काम गेल्या दोन वर्षापासून सुरू आहे. काम सुरू करत असताना अगोदर पुलांची कामे करणे आवश्यक असताना किंवा पावसाळ्या अगोदर काम पूर्ण करणे गरजेचे असताना गुत्तेदाराने ऐन पावसाळ्याच्या तोंडावर या पुलांचे काम सुरू केले आहे. परळी- बीड मार्गावर तालुक्यातील नागापूर येथून वाहणारी मोठी वाण नदी वाहते. या नदीला दरवर्षी नागापूरचे वाण धरण भरल्यानंतर मोठ्या प्रमाणावर पूर येतो. वाण नदी बरोबरच मार्गावरील वाफ नदी, पापनाशी, गुणवरा नदी याही नद्यावरील पुलाचे काम ऐन पावसाळ्याच्या तोंडावर सुरू करण्यात आले आहे. काम सुरु करत असताना जुना पूल पाडल्यानंतर या नद्यांवर जी तात्पुरते पर्यायी व्यवस्था करण्यात आली आहे. याठिकाणी मोठ-मोठ्या नाल्या टाकणे अपेक्षित होते. कारण या नद्या पावसाळ्यात दुथडी भरून वाहतात. पण संबंधित गुत्तेदाराने सुरुवातीला फक्त भराव टाकला होता. जसे काही या नद्यांना पाणी येणार नाही असे गृहीत धरुन काम केले गेले. गेल्या काही दिवसात जोरदार पाउस बरसत असल्याने नदी, नाले वाहत आहेत. नद्यांना पूर येत आहेत. या मार्गावर तात्पुरत्या स्वरुपात बांधलेले पूल व त्याचा भराव वाहून जात आहे. यामुळे या मार्गावरील वाहतूक ठप्प होत आहे. रविवारी दिवसभर सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे पांगरी सह इतर नदीवरील पूल वाहून गेल्या मार्गावरील वाहतूक ठप्प झाली आहे. यामुळे नागरिकांची, वाहन चालकांची मोठी गैरसोय होत आहे.

### परळी तालुक्यात पावसाची जोरदार बॅटींग

शनिवारी (दि.३१) रात्रीपासून परळी तालुक्यात सर्वदूर जोरदार पाउस बरसतो आहे. रविवारी दिवसभर पावसाची बॅटींग सुरु होती. या पावसामुळे तालुक्यातील नदी, नाल्यांना पूर आले आहेत. सर्व नद्या दुथडी भरुन वाहत आहेत. शेतशिवारात पाणीच पाणी झाले आहे. विजेच्या कडकडाटासह पाउस बरसतो आहे. यंदाच्या पावसाळ्यात रविवारचा सर्वात मोठा पाउस होता. तालुक्यातील सिरसाळा पट्टयात पावसाचा जोर अधिक दिसून आला तर धर्मापुरी भागात त्या तुलनेत कमी पाउस होता. रविवारी दिवसभर तालुक्यात सूर्यदर्शन झाले नाही. ***

## मराठा योद्धा मनोजदादा जरांगे पाटील यांची ८ सप्टेंबरला परळी येथे घोंगडी बैठक

परळी वैजनाथ, (बातमीदार):- मराठायोद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या मतदार संघनिहाय घोंगडी बैठका होत आहेत. येत्या रविवारी (दि.८) परळी येथे घोंगडी बैठक होणार आहे. या बैठकीची जोरदार तयारी सध्या सुरू झाली आहे.



या बैठकीच्या पूर्वतयारीसाठी शहरातील श्रद्धा मंगल कार्यालयात समाजाची बैठक पार पडली. या बैठकीमध्ये घोंगडी बैठकीच्या तयारीसाठी ज्या प्रकारे नियोजन करावे लागणार आहे. त्याबद्दल समाज बांधवांनी विस्तारित चर्चा व मंथन केले. दरम्यान परळी मतदारसंघातील समाजातील लहान थोर, वडीलधारी मंडळी, महिला यांनी सहभागी व्हावे तसेच या विषयी प्रचार प्रसार करण्यासाठी वेगवेगळ्या समित्या तयार करण्यात आल्या असून ही घोंगडी बैठक समाजाला दिशा देणारी असेल असा विश्वास या प्रसंगी समाज बांधवांनी व्यक्त केला. दरम्यान रविवारी शहरातील हालगे गार्डन येथे होणार असल्याची माहिती देण्यात आली. **

## नागापूर वाण धरणावरील तोडलेले वीज कनेक्शन तात्काळ जोडा; अन्यथा परळी तहसील कार्यालयासमोर धरणे आंदोलन-राजाभाऊ फड

परळी वैजनाथ, (बातमीदार):- वान धरणावरील रोहित्र गतवर्षी परळी शहर व ग्रामीण भागातील पाणीटंचाई असल्यामुळे नगरपालिका प्रशासन व महावितरण कंपनीने उतरवून नेले होते. परंतु यंदा हे धरण १०० टक्के भरले असून पिण्याचा पाण्याचा प्रश्न मिटला आहे. महावितरण कंपनीने वाण धरणावरील रोहित्र बसवून तात्काळ वीज पुरवठा सुरू करावा अन्यथा परळी तहसील कार्यालयासमोर लवकरच शेतकऱ्यासह धरणे आंदोलन करण्यात येईल असा इशारा रासपचे महाराष्ट्र युवा प्रदेशाध्यक्ष राजेभाऊ फड यांनी जिल्हाधिकारी बीड यांना एका निवेदनाद्वारे दिला आहे.

याबाबत जिल्हाधिकारी बीड यांना दिलेल्या निवेदनात राजाभाऊ फड यांनी म्हटले आहे की, नागापूर वाण धरणात पाणीसाठा कमी असल्या कारणाने परळी शहर व ग्रामीण भागात पाणीपुरवठा करण्यासाठी हे वाण धरण ऑगस्ट २०२३ मध्ये आरक्षित करण्यात आले होते. धरणावरील ट्रांसफार्मर महसूल विभाग व नगरपालिका तसेच पोलीस प्रशासन यांनी एकत्र येऊन उतरवून नेत असताना वाण



धरणावरील उपसा सिंचनाचा लाभ घेणाऱ्या शेतकऱ्यांनी बंद काळातील वीज बिल माफ झाले पाहिजे असे लेखी मागितले होते. तेव्हा चार तासानंतर विज वितरणाचे परळी डेपोटी इंजिनियर श्री राठोड यांनी प्रत्यक्ष त्या ठिकाणी न ये ता तात्पुरते कॉल वर व व्हाट्सअप वर कनेक्शन कट करण्याचे लेखी हमीपत्र शेतकऱ्यांना पाठवले व नंतर शेतकऱ्यांनी ट्रांसफार्मर काढण्यास परवानगी दिली होती. २०१५ पासून या नागापूर वान धरणावर एक वर्ष आड करून अशाच पद्धतीने पाणी आरक्षित केले जाते शेतकऱ्यांचे ट्रांसफार्मर काढून घेऊन जातात परंतु परत मोफत बसवून देताना शेतकऱ्यांना मोफत बसवून देण्याऐवजी पैसे भरा अशा पद्धतीचा रेटा लावला जातो. शेतकऱ्यांना वेळेत ट्रांसफार्मर बसून मिळणे तर सोडा परंतु अनेक वेळेस प्रशासनाच्या दारी खेटे मारावे लागतात. या वाण धरणा मधला पाण्याचा थे ब ही कुठे उचलला जात नाही ज्या शेतकऱ्यांना विजय शिवाय पाणी घेता येत नाही असे शेतकरी पाण्यापासून वंचित राहतात.

संबंधित बंद काळातील विजेचे बिल शेतकऱ्यांच्या माथे मारले जाते यासाठी याआधी अनेक वेळेस मी व शेतकऱ्यांच्या मार्फत शासन दरबारी अनेक लढे व निवेदन दिले परंतु याचा कोणताही परिणाम प्रशासनावर झालेला नाही हा प्रश्न शेतकऱ्यांचा असून याला गांभीर्याने घेत या नागापूर वाण धरणावरील तोडलेले वीज कनेक्शन तात्काळ जोडून द्यावे. जेणे करून रब्बी पिकासाठी व पावसाची अतिवृष्टी झाली तर खरीपासाठी सुद्धा पाणी वापरता येईल. अन्यथा परळी तहसील कार्यालय या ठिकाणी शेतकऱ्यांमार्फत धरणे आंदोलन करण्यात येईल. असा इशारा निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी बीड यांना महाराष्ट्र युवा प्रदेशाध्यक्ष राजाभाऊ श्रीराम फड यांनी दिला आहे. ***

## जेष्ठ नेत्या सुदामतीताई गुट्टे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा सत्कार



परळी वैजनाथ, (बातमीदार):- वैद्यकिय शिक्षणासाठी निवड झालेल्या परळी शहरातील विद्यार्थ्यांचा राष्ट्रवादी काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या सुदामतीताई गुट्टे यांच्या संपर्क कार्यालयात विद्यार्थी व त्यांच्या पालकांचा सत्कार करण्यात आला.

सौ.गुट्टे यांच्या संपर्क कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमात आदित्य आघाव, प्रवीण राजकुमार डाके, आदिती विलासराव आदोडे आदी विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा सत्कार श्रीमती गुट्टे यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देवून करण्यात आला व शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी देवराव लुगडे, अॅड.जीवनराव देशमुख, किरण पवार, फिरोजभाई आदी यावेळी उपस्थित होते.*

## राज्य गणेशोत्सव स्पर्धेचे अर्ज स्वीकारण्यास ५ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ

बीड (जि.मा.का.):- महाराष्ट्र शासनाच्या पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, सांस्कृतिक कार्य विभाग यांच्या वतीने 'महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा २०२४' चे आयोजन करण्यात आले आहे. जास्तीत जास्त गणेशोत्सव मंडळांना स्पर्धेत सहभागी होता यावं यासाठी अर्ज स्वीकारण्याची अंतिम तारीख ५ सप्टेंबर २०२४ करण्यात आली आहे.

गणेशोत्सव मंडळांनी संपूर्ण भरलेला अर्ज mahotsav.pldagmail.com या ई-मेल आय. डी. वर पाठवणे आवश्यक आहे. स्पर्धेत नोंदणीकृत संस्था किंवा परवानाधारक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे सहभागी होऊ शकतात. स्पर्धेचा अर्ज पु.ल.



देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबईच्या संकेत स्थळावर उपलब्ध असून स्पर्धा नि:शुल्क आहे. सांस्कृतिक कार्यक्रम, सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन, संस्कृतीचे जतन व संवर्धन याकरिता राबविण्यात आलेले उपक्रम, गडकिल्ले यांचे जतन व संवर्धन, राष्ट्रीय व राज्य स्मारके, धार्मिक स्थळे यांविषयी जनजागृकता तसेच जतन व संवर्धन, विविध सामाजिक उपक्रम व कार्ये, पर्यावरणपूरक मूर्ती, पर्यावरणपूरक सजावट ,ध्वनिप्रदूषण रहित वातावरण, गणेशभक्तासाठी केलेल्या सोयी सुविधा यांच्या आधारे केलेल्या कार्याचा गौरव व्हावा आणि असेच समाजाभिमुख उपक्रम अधिकाधिक घडावेत म्हणून प्रोत्साहनपर पुरस्कार देण्याचे शासनाचे उद्दिष्ट आहे. याच निकषांच्या आधारे स्पर्धेचे परीक्षण केले जाईल. ७ सप्टेंबरपासून सुरू होणाऱ्या गणेशोत्सवात सर्व जिल्ह्यांच्या जिल्हाधिकारी कार्यालयांनी गठीत केलेली जिल्हास्तरीय समिती या स्पर्धेत सहभागी मंडळे किंवा संस्थांच्या उत्सवस्थळाला भेट देतील आणि जिल्हास्तरीय परीक्षण पूर्ण करतील. मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे आणि पुणे हे ४ जिल्हे प्रत्येकी ३ आणि हे ४ जिल्हे वगळता अन्य ३२ अशा प्रत्येक जिल्ह्यातून एक यानुसार एकूण ४४ शिफारसी राज्यस्तरीय परीक्षणासाठी स्वीकारल्या जातील. राज्यस्तरीय परीक्षणात प्रथम तीन विजेत्यांना अनुक्रमे ५ लाख, २.५ लाख आणि १ लाख रुपयांचे पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात येणार आहे. तसेच अन्य जिल्हास्तरीय प्रथम विजेत्यांना रु. २५,०००/- रुपयांचे पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात येणार आहे. या स्पर्धेत अधिकाधिक संख्येने सहभाग नोंदवण्याचे आवाहन शासनातर्फे करण्यात आले आहे. स्पर्धेच्या अधिक माहितीसाठी सर्वांनी आपापल्या जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा. ***

(पान ३ वरुन)... **नियोजित वीज प्रकल्प परळीतच उभारावा -अॅड.देशमुख**

जलप्रकल्प ओसांडून वाहत आहेत तसेच जायकवाडी प्रकल्पात ६५% पाणी साठा झाला आहे. तसेच गोदावरी नदीवर खडका येथे विद्युत प्रकल्पासाठी बंधारा ही केलेला आहे. ज्यामळे औ. वि. केंद्रासाठी पाण्याचा मुबलक साठा आहे. त्याचबरोबर परळी नगर पालिकेला भुयारी गटारमधून पाण्याचे शुद्धीकरण करुन वाया जाणारे पाणी प्रक्रिया करुन वापरण्यासाठी भुयारी गटार योजनेसाठी १५० कोटी रुपये शासनाने दिलेले आहेत. या निधीचा वापर हा गैरमार्गाने झालेला आहे.अद्याप भुयारी गटार योजनेमुळे परळी शहरातील पुर्ण रस्ते हे फोडलेले असून कोठेही भुयारी गटारातून पाणी जात नसल्याची स्थिती आहे.याचीही सखोल चौकशी करावी.परळी शहरातील बिना वापराचे पाणी है औ.वि. केंद्रास मिळण्यासाठी आदेश द्यावेत. जेणेकरून प्रकल्पाला कोणत्याही प्रकारची पाण्याची टंचाई राहणार नाही. तसेच दुहेरी रेल्वे मार्ग हा विद्युत ऊर्जेवर चालणाराही केलेला आहे. त्यामुळे कोळसा वाहतुकीचा खर्चही निश्चितच कमी होणार आहे. त्यामुळे परळी वै. येथील वाढीव क्षमतेचा ६०० मे. वॅट चा संच उभारणी करीता योग्य ती कार्यवाही करावी व प्रकल्प परळीतच उभारावा. अन्यथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने प्रसंगी रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याचा इशारा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) शहराध्यक्ष अॅड. जीवनराव देशमुख यांनी दिला आहे.*

## मंकीपॉक्सला घाबरू नका; सतर्क रहावे-मार्गदर्शक सूचना जारी

मुंबई, (जि.मा.का.):- जगभरात काही ठिकाणी मंकीपॉक्स आजाराची साथ दिसून आल्यामुळे जागतिक आरोग्य संघटनेने मंकीपॉक्सच्या साथीला जागतिक स्वास्थ्य आणीबाणी घोषित केले आहे. मंकीपॉक्स संसर्गाचा वेग आणि रोगाची तीव्रता लक्षात घेता केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाने मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहे. त्याचा अवलंब करण्याचे आदेश सर्व राज्यांना दिले आहेत. या पार्श्वभूमीवर राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने मंकीपॉक्स सर्वेक्षण, प्रतिबंध आणि नियंत्रण उपाययोजना करण्याबाबत मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत.

मंकीपॉक्सच्या आजाराबाबत जागतिक आरोग्य संघटनेने दिलेल्या सूचनेनुसार केंद्र सरकारने उच्चस्तरीय बैठक घेऊन प्रतिबंध व उपाययोजना राबविण्याबाबत सूचना दिल्या आहेत. केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने राज्यांना मार्गदर्शक सूचना केल्या आहेत. यामध्ये सर्व विमानतळे, बंदरे आणि आरोग्य युनिट्सना सतर्क करणे, चाचणी प्रयोगशाळा तयार करणे, तपासणीसाठी आरोग्य सुविधा तयार करणे, मंकीपॉक्सचा एखादा रुग्ण सापडल्यास तत्काळ उपाययोजना करण्यात याव्यात याचा सामावेश आहे. यानुसार राज्याने याबाबत सर्वेक्षण, प्रतिबंधक मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत.

**नागरिकांनी आरोग्य विभागाच्या सूचनांचे पालन करावे**

**आरोग्य सेवा आयुक्त अमगोथू श्रीरंगा नायक:-** मंकीपॉक्स या संसर्गजन्य आजाराला घाबरून न जाता नागरिकांनी सतर्क रहावे व सार्वजनिक आरोग्य विभागाने दिलेल्या सूचनांचे पालन करावे. तसेच या आजाराबाबत संशयित रुग्ण आढळल्यास किंवा काही लक्षणे



आढळल्यास त्वरित शासकीय आरोग्य केंद्राशी संपर्क साधावा, असे आवाहन आरोग्य सेवा आयुक्त अमगोथू श्रीरंगा नायक यांनी केले आहे.

मंकीपॉक्स या आजाराविषयी काळजी घेण्यात येत असून जिल्ह्यातील आपल्या कार्यक्षेत्रात मंकीपॉक्स सर्वेक्षण, प्रतिबंध आणि नियंत्रण उपाययोजना करण्याबाबतचे निर्देश आरोग्य उपसंचालक, आरोग्य अधिकारी, महापालिकांचे आरोग्य अधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्य चिकित्सक यांनाही आयुक्त श्री. नायक यांनी निर्देश दिले आहेत.

**मंकीपॉक्स म्हणजे काय?** मंकीपॉक्स हा आजार ऑर्थोपोक्स या डीएनए प्रकारच्या विषाणूमुळे होतो. काही प्रकारच्या खारी आणि उंदरांमध्ये हा विषाणू आढळतो. हे प्राणी या विषाणूचे नैर्सगिक स्त्रोत आहेत. अंगावर पुरळ उमटण्यापूर्वी १ ते २ दिवसापासून ते त्वचेवरील फोडांवरील खपल्या पडेपर्यंत किंवा ते पूर्णपणे मावळेपर्यंत, बाधित रुग्ण इतर व्यक्तींसाठी संसर्गजन्य असतो. मंकीपॉक्स हा प्रामुख्याने माणसापासून माणसाला होणारी लागण जसे की, थेट शारीरिक संपर्क, शरीर द्रव, लैंगिक संपर्क किंवा जखम, घाव यातील स्राव, बाधित व्यक्तीने वापरलेल्या कपड्यांमार्फत, जर खूप वेळ बाधित व्यक्तीचे संपर्क आला तर श्वसन मार्गातून बाहेर पडणाऱ्या मोठ्या थेंबा वाटे संसर्ग होऊ शकतो. त्याचप्रमाणे, प्राण्यांपासून माणसालाही मंकीपॉक्सची लागण होऊ शकते. बाधित प्राणी चावल्यामुळे किंवा बाधित प्राण्याचे मांस न शिजवता खाण्यामुळे देखील या आजाराचा संसर्ग होऊ शकतो.

**संशयित रुणाची लक्षणे:-**

* मागील ३ आठवड्यात मंकीपॉक्सबाधित देशांमध्ये प्रवास करुन राज्यात आलेल्या व्यक्तींच्या शरीरावर अचानक पुरळ उठणे.
* सुजलेल्या लसिका ग्रंथी * ताप
* डोकेदुखी * अंगदुखी * प्रचंड थकवा
* घसा खवखवणे आणि खोकला

**मंकीपॉक्स न होण्यासाठी घ्यावयाची काळजी-**

* संशयित मंकीपॉक्स रुग्णास वेळीच विलग करणे.
* रुग्णांच्या कपड्यांशी अथवा अंथरुणा पांघरुणाची संपर्क येऊ न देणे. * हातांची स्वच्छता ठेवणे.
* आरोग्य संस्थांमध्ये मंकीपॉक्स रुग्णावर उपचार करताना पीपीई किटचा वापर करणे. * नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता शासनातर्फे देण्यात येणाऱ्या सूचनांचे पालन करणे.

संपादकीय...

# पशूधन जपुया..!

**सुविचार :–**
कष्टाशिवाय मातीला, बैलाशिवाय शेतीला आणि बळीराजा शिवाय देशाच्या प्रगतीला पर्याय नाही.

श्रावणात राखी पौर्णिमा झाली की बाजारातील दुकाने बैलपोळयाच्या साजाने सजतात. शेतकरीही त्याच्या दृष्टीने महत्वाच्या असलेल्या बैळपोळयाच्या सणाची अतुरतेने वाट पहात असतो. या सणाची कितीतरी दिवस अगोदर पासून तयारी सुरू असते. शहरी भागापेक्षा ग्रामीण भागात बैलपोळयाचा सण मोठ्या उत्साहात आणि धुमधडाक्यात साजरा होतो. गाव शिवारात खळखळ वाहणाऱ्या नदी, ओढ्यात, झऱ्यावर बैलांसह इतर गुरांना नेऊन त्यांना स्वच्छ धुतले जाते. पोळयाच्या आदल्या दिवशी बैलांची लोणी, तुपा–हाळदीने खांदेमळणी केली जाते. वर्षभर ज्या खांद्यावर औताचे, गाडीचे ओझे वाहिलेले असते. त्या खाद्यांची खांदे मळणी करुन शेतकरी बैलांनी केलेल्या कष्टातून उतराई होण्याचा प्रयत्न यानिमित्ताने करत असतो. गुरे बांधण्याची जागा म्हणजे गोठे स्वच्छ करुन सजवले जातात. बैलाच्या शिंगाना आकर्षक रंग लावला जातो. त्याच्या अंगावरही रंगाचे ठिपके काढले जातात. पोळयाच्या दिवशी बैलाच्या अंगावर रंगीबेरंगी झुली घालतात. गळ्यात घुंगरमाळा, डोक्याला लोकरीचे गोंडे, माथ्यावर आरशाचे तोरण, नाकात नव्या दोरीचे वेसन घातले जाते. गाडीचा कासराही बदलातात. बैलांसह इतर गुरांची गावातून वाजतगाजत धुमधडाक्यात मिरवणूक निघते. हालगी ढोलताशांच्या गजरात निघालेल्या बैलांच्या मिरवणुकीने अख्खा गाव व शिवार दणाणून जातो. बैलांसह इतर गुरांची पूजा होते. त्यांना पुरणपोळीचा नैवेद्य दिला जातो. गावातल्या मारुतीच्या मंदिरापुढील मैदानावर शेतकरी आपल्या बैलांसह इतर गुरे आणतात. मान–पानाच्या नाट्याचे पडसाद तिथे दिसायचे. हा सोहळा त्यातला आनंद, उत्साह मोठा दिमाखदार व्हायचा. अशा पद्धतीने बैलपोळयाचा सण आपल्याकडे मोठ्या उत्साहात साजरा होतो. वर्षभर शेतात शेतकऱ्यांबरोबर राबराबलेल्या या मुक्या जीवाच्या कष्टरुपी ऋणातून मुक्त होण्याचा शेतकऱ्यांचा हा प्रयत्न असतो. बैलपोळ्याच्या सणाची शेकडो वर्षाची परंपरा शेतकऱ्यांनी जपलेली आहे. बैलपोळयाच्या सणाचे चित्रण चित्रकारांनी केलेले आहे. शिवाय साहित्यांतूनही ते मोठ्या प्रमाणात दिसते. ‘सण एक दिन..’ सारखी कविता किंवा ‘आम्ही कष्टाळू शेतकरी...काळी आई आमची पंढरी’, ‘आमच्या दुनियेची दौलत सारी...ही जोडी बैलाची खिल्लारी’ या सारखी गाणी आपल्या ओठावर असतात. बदलत्या काळात बैलपोळयाचा पूर्वी सारखा उत्साह आज आपल्याकडे राहिलेला नाही किंवा तो कमी होत चालला आहे. शेती आणि शेतकऱ्यांवर चारही बाजूने संकटे येतात. कधी दुष्काळ तर कधी अतिवृष्टी, कधी पिकले तर त्याला भाव नाही. वाढती महागाई, कर्जबाजारीपणामुळे कृषीप्रधान देशाची शेती, शेतकरी आज मोठ्या संकटात आहे. शेती आणि शेतकऱ्यांच्या मदतीसाठी शासनाच्या विविध योजना असल्या तरी त्याला मर्यादा पडत आहे. शेतशिवारातून पशूधन घटत चालले आहे. भाऊ वाटण्यांमुळे शेत जमिनीचे कमी कमी होत गेलेले तुकडे, गुरे सांभाळण्याचा न परवडणारा खर्च, त्यांच्या वाढत्या किंमती यामुळे ग्रामीण भागात शेता–शिवारातील सर्जा–राजासह इतर गुरांची संख्या मोठ्या प्रमाणात घटत चालली आहे. दुधासाठी अधिक उत्पादन देणाऱ्या गाई, म्हशी बाहेरुन आणल्या जात आहेत. त्यामुळे आपल्या मातीतील गाई–गुरांची संख्या कमी झाली आहे. ती होतेही आहे. शेतातील कामे यंत्राद्वारे सुरू झाल्याने अनेक शेतकऱ्यांकडे बैलजोड्या राहिलेल्या नाहीत. त्यामुळे शेता–शिवारातून मोठ्या प्रमाणात गुरे हद्दपार होत चालली आहेत. शेणखताची जागा कृत्रिम खताने घेतल्याने पशूधनाचे महत्व कमी झाले आहे. कत्तलखाण्याकडे जाणाऱ्या गुरांची संख्या वाढली आहे. एकूणच आज पशूधन कमी होत चालले आहे. शेता–शिवारात बैलगाड्यांचा धुरुळा राहिला नाही. ट्रॅक्टरने त्यांची जागा घेतली आहे. घुंगरांचा आवाज मुका झाला आहे. पशूधन शेती आणि शेतकऱ्यांसाठी मोठी महत्वाची बाब आहे हे धन जपणे गरजेचे आहे. यासाठी व्यापक प्रयत्न व्हायला हवेत असे वाटते. ***

# कर्तव्यनिष्ठ केंद्र प्रमुख : कमलाकर कापसे

सक्षम प्रशासक, कार्यक्षम संघटक, उत्तम व्यवस्थापक ,विद्यार्थी आणि समाजासाठी कार्य करणारे आदर्श अध्यापक, कर्तव्यनिष्ठ केंद्रप्रमुख असे बहुआयामी व्यक्तीमत्व म्हणजे कमलाकर कापसे सर होय. श्री. कमलाकर विश्वांभर कापसे यांचा जन्म ०५/०८/१९६६ साली गौरगाव ता. कळंब जि. धाराशिव येथे झाला. त्यांनी बीए. बीएड.पदवीचे शिक्षण घेऊन इ. १ ली ते १० वीच्या वर्गांसाठी अध्यापन कार्य केले. विविध शैक्षणिक–सामाजिक–सांस्कृतिक–साहित्यिक कार्यात त्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे . केंद्रप्रमुख म्हणून कार्य करताना शहरातील नामांकित संस्थाशी त्यांचा संबंध आला. समानतेचे तत्त्व समोर ठेवून त्यांनी शिक्षण क्षेत्रात अखंड सेवा केली. आपल्या कार्यकाळात ग्रामीण भागात शालेय व प्रशासकीय यंत्रणा उभी केली. शालेय प्रशासनात सर्व शिक्षक व शिक्षेकत्तर कर्मचारी वर्गाचा सहभाग असेल तर एकतेची भावना बळकट होईल आणि विद्यार्थ्यांचे प्रश्न अग्रक्रमाने सोडवले जातील, अशी कमलाकर कापसे सरांची धारणा आहे.

अध्यापक तथा केंद्रप्रमुख म्हणून कमलाकर कापसे यांनी अत्यंत निष्ठेने सेवा केली. केंद्रप्रमुख हे पद शिक्षक व प्रशासन याना जोडणारा दुवा असते.त्या दोघांमधील सुवर्णमध्य साधणारा असतो. म्हणून केंद्रप्रमुखात तेवढी विचारांची, अनुभवाची परिपक्वता असली तर ते विद्यालयाला नंदनवन बनवणारे महत्वाचे घटक ठरतात.बीड जिल्ह्यात शालेय शिक्षण विभागात त्यांनी पायाभरणीपासून योगदान दिले. त्यांच्यातील उत्कृष्ट सारथ्य गुणांमुळे अंबाजोगाई तालुक्यातील अनेक विद्यालयाचा रथ योग्य प्रगतिपथावरुन ध्येयपूर्तीकडे वाटचाल करीत आहे. केंद्रप्रमुख कमलाकर कापसे सर हे समाजनिष्ठ, ज्ञाननिष्ठ, विद्यार्थीनिष्ठ त्याचप्रमाणें कर्तव्यनिष्ठ पदाधिकारी म्हणून सर्वपरिचित आहेत. नाविन्याचा ध्यास असणारे उपक्रमशील, विद्यार्थीप्रिय शिक्षक म्हणून आम्ही आजही त्यांना आदराने ओळखतो. जिल्हा परिषद माध्यमिक शाळा गिरवली, ता.अंबाजोगाई येथे त्यांनी आम्हाला घडविले. माझ्यातील सांस्कृतिक कला गुणांना वाव देऊन माझी कलावंत म्हणून जडणघडण करणारे कमलाकर कापसे गुरुजी माझे आदर्श आहेत. त्यांनी माझ्या सांस्कृतिक जाणीव प्रगल्भ केल्या. शिक्षकांच्या योग्यतेप्रमाणे कौतुकाची थाप देऊन वेळप्रसंगी त्यांना खडेबोल सूनविणारे स्पष्टवक्ते अशी त्यांची ख्याती आहे. खऱ्या अर्थाने आदरणीय कापसे सर हे नियोजनाचा महामेरू आहेत. नियोजनात सर्व शिक्षकांचा सहभाग असावा म्हणून ते सर्वसमावेशक भूमिका घेत असतात. स्वतः



नीतिमान,शिस्तप्रिय,वक्तशीरपणाचे पालन करणारे आदर्श केंद्रप्रमुख म्हणून कापसे सर सुपरिचित आहेत.

सन्माननीय कापसे सरांचा सगळ्यात महत्वाचा गुण म्हणजे गुणग्राहकता. योग्य व्यक्तीची पारख त्यांना आहे. शिक्षक व विद्यार्थी यांच्यामधील गुणाची पारख करून त्या गुणाना प्रोत्साहन देवून विद्यालयाचे नाव उंचावण्यात व विद्यालयाच्या सर्वांगीण विकासात त्याचा यथायोग्य उपयोग करून घेणारे केंद्रप्रमुख म्हणून शैक्षणिक क्षेत्रात त्यांचा नावलौकिक आहे.विद्यार्थी व शिक्षकांच्या कलागुणांना वाव देणारे कापसे सर सांस्कृतिक कार्यक्रम आयोजनात सक्रिय असतात. विद्यालयाच्या सर्वांगीण विकासासाठी विद्यार्थ्यामध्ये सामाजिक भान,सामाजिक जाणीव, राष्ट्रप्रेम, राष्ट्रीयएकात्मता, स्त्रीपुरूष समानता, वक्तशीरपणा, वैज्ञानिक दृष्टिकोन, संवेदनशीलता, श्रमप्रतिष्ठा,अशा मूल्यांची रुजवण करणारे उपक्रम शाळेत राबविण्यासाठी सातत्याने ते प्रयत्नशील असतात.

महत्वाचे म्हणजे ते निर्व्यसनी, सत्शील व्यक्ती म्हणून सर्वप्रिय आहेत . शाळेच्या विकासासाठी तन मन धनाने धडपडणारे, सर्व शिक्षकाकडून अधिक जबाबदारीने कार्य पूर्णकरून घेणारे कर्तव्यदक्ष केंद्रप्रमुख आहेत. विद्यार्थ्यांना विविध शैक्षणिक सुविधा निर्माण करून या भागाचा विकास साधला आहे.तसेच विद्यार्थ्यांच्या बौध्दिक विकासासोबत सर्वांगीण विकासाठी वेगवेगळे उपक्रम त्यांनी राबविले. कापसे सरांच्या समवेत मी अनेक वर्षांपासून संपर्कात आहे. माझ्यावर विश्वास दाखवून कापसे सरांनी आम्हाला प्रेरणा आणि प्रोत्साहन दिले आहे. वैज्ञानिक प्रदर्शने, मेळावे, वाचनसंस्कृती, ग्रंथप्रदर्शने, सांस्कृतिक मेळावे यांचे आयोजन करण्यात आदरणीय कापसे सरांचे विशेष योगदान आहे.

केंद्रप्रमुख जेवढा सक्रिय, उपक्रमशील तेवढा त्या विद्यालयांचा प्रगतीचा आलेख हा उंच असतो. हा आलेख उपक्रमशील कापसे सरांनी उंचावला आहे. अनेक वर्षे अविरतपणे सेवा देऊन आदरणीय कापसे सरांनी अनेक उत्तम विद्यार्थी घडविले. तेच विद्यार्थी आज विविध क्षेत्रात कार्यरत आहेत. शाळेत सर्वांशी समजुतीने वागणारे, वेळप्रसंगी सर्वाना सांभाळून घेणारे, उत्तम नेतृत्वगुण असणारे आमचे आदरणीय कमलाकर कापसे सर नियमित वयोमानानुसार सेवापूर्ण करून ३१ ऑगस्ट २०२४ रोजी सेवानिवृत्त होत आहेत. त्यांना उदंड आयुष्य लाभो. हीच सदिच्छा.!

**– प्रा.डॉ.सिद्धार्थ तायडे**
परळी वैजनाथ.

## कारच्या धडकेत दुचाकीवरील एकजण ठार

परळी वैजनाथ, (बातमीदार)ः– परळी वैजनाथ तालुक्यातील इंजेगाव येथे घडलेल्या आपघातात एकजण ठार झाला आहे. परळी– सोनपेठ मार्गावर क्रिएटा व दुचाकीची समोरासमोर धडक होवुन झालेल्या अपघातात इंजेगाव येथील एकजण ठार झाल्याची घटना शुक्रवार दि.३० ऑगस्ट रोजी रात्री आठ वाजता घडली. इंजेगाव येथील ज्ञानोबा पंडित कराड हे आपल्या शेतात काम करुन दुचाकीवरुन घरी येत असताना समोरुन येणाऱ्या क्रिएटा गाडीने जोराची धडक दिल्याने गंभीर जखमी झाले. गावकर्यांनी त्यांना रात्री ८.३० वाजता उपजिल्हा रुग्णालयात आणले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले. अपघाताचे वृत्त कळताच नातलगांनी उपजिल्हा रुग्णालयात गर्दी केली होती. ***

**‘परळी परिसर’** हे साप्ताहिक मुद्रक, प्रकाशक, मालक एस.एल.वाकडे यांनी न्यू सुधांशू प्रिंटर्स, श्रीनाथ चित्र मंदिरमागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, ता.परळी वैजनाथ, जि.बीड ४३१५१५ (महाराष्ट्र) येथे छापून तेथेच प्रकाशित केले. संपादक एस.एल.वाकडे.मो.९४२२३२८४९३. e-mail : parliparisar2017@gmail.com (या साप्ताहिकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या व लेखास संपादक सहमतच असतील असे नाही.)
RNI No.-MAHMAR/2017/74640 Post Reg.No.L/174/RNP/Beed/2023-25 (सर्व वाद परळी न्यायकक्षेत) www.parliparisar.com

# परळी औष्णिक विद्युत केंद्रात नवीन संच उभारणी आता होणार नाही !

परळी वैजनाथ, (बातमीदार):-
मराठवाड्यातील एकमेव औष्णिक विद्युत केंद्र म्हणून ओळख असलेल्या परळी वैजनाथ येथील औष्णिक विद्युत प्रकल्पातील अनेक संच यापूर्वीच बंद करण्यात आले आहेत. सध्या केवळ तीन संच सुरू आहेत. दरम्यान परळी औष्णिक विद्युत केंद्रात संच क्रमांक ९ या संचाला मंजुरी देण्यात आलेली होती. त्याची उभारणी होणे बाकी आहे. मात्र औष्णिक विद्युत केंद्रातआता हा मंजूर नवीन संच उभारला जाणार नसल्याचेच प्रशासनाच्या एका पत्रातून स्पष्ट झाले आहे.

ऊर्जा मंत्रालय भारत सरकार यांनी १३ नोव्हेंबर २००९ ला परळी वैजनाथ येथे ६६० मेगावॅट वीज निर्मिती प्रकल्पास मंजूरी दिलेली होती. मात्र आता ते होणार नसल्याचे स्पष्ट झाले आहे.यासंबंधी अधीक्षक अभियंता (संचलन) (प्र), महावितरण प्रादेशिक कार्यालय छत्रपती संभाजी नगर यांना परळी औष्णिक वीज निर्मिती केंद्राचे मुख्य अभियंता यांन दि.२७ ऑगस्ट रोजी पत्र पाठवून याबाबत स्पष्टीकरण दिले आहे. जा.क्र.मु.अ. /संवसु/औविकें/परळी ०४०३४ दिनांक २७ ऑगस्ट २०२४ नुसार दिलेल्या पत्रात नमूद केले आहे की, ऊर्जा मंत्रालय भारत सरकार यांच्या दिनांक १३.११. २००९ च्या कार्यालयीन निवेदनानुसार पुढील क्षमता वाढ सुपर क्रिटिकल संचाद्वारे असावी असे आदेशित आहे. सद्यस्थितीत ६६० मेगावॅट व त्यापेक्षा अधिक क्षमतेच्या संचासाठी सुपर क्रिटिकल तंत्रज्ञान उपलब्ध आहे व ६६० मेगावॅट क्षमतेच्या संचासाठी परळी औष्णिक विद्युत केंद्र येथे पाणी, कोळसा इत्यादींची सद्यस्थितीत उपलब्धता नाही तसेच परळी औष्णिक विद्युत केंद्र कोळसा स्त्रोतापासून दूर असल्याने कोळसा



वहनासाठी होणारा जास्तीचा व्यय विचारात घेता संचातून निर्माण होणारा विजेचा संभावित अस्थिर आकार जास्त असेल एम ओ डी प्रणालीनुसार जास्त अस्थिर आकार असलेल्या संचातून नियमितपणे वीज निर्मिती होण्याबद्दल साशंकता असते. वरील सर्व कारणामुळे सद्यस्थितीत औष्णिक विद्युत केंद्र परळी येथे नवीन संच उभारणे महानिर्मितीच्या विचाराधीन नाही. असा स्पष्ट अभिप्राय कळवण्यात आला आहे. त्यामुळे परळीतील नियोजित संच क्रमांक ९ हे औष्णिक विद्युत निर्मिती केंद्र होणार नसल्याचेच स्पष्ट झाले आहे.

**सध्यस्थिती: परळी वैजनाथ औष्णिक वीज प्रकल्प....**

परळी औष्णिक विद्युत केंद्रातील संच क्रमांक १,२,३,४,५ ते सर्व संच आयुर्मान संपल्यामुळे बंद ठेवून लिलावात काढण्यात आले आहेत. तर संच क्रमांक ६,७,८ हे तीन नवीन संच नवीन परळीऔष्णिक विद्युत केंद्रात चालू आहेत. या तीन संचाची एकूण स्थापित क्षमता ७५० मेगावॅटएवढी असून हे तिन्ही संच सध्या क्षमतेच्या जवळपासवीजनिर्मिती करीत आहेत.या विद्युत केंद्रातील संच क्रमांक ९ ही मंजूर आहे परंतु त्याची उभारणी अद्याप करण्यात आलेली नाही. हा संच क्रमांक ९ आता होणार नसल्याचेच स्पष्ट झाले आहे.

**परळी वैजनाथ औष्णिक विद्युत केंद्राचा इतिहास....** २९ मे १९६६ रोजी भारताचे तत्कालीन संरक्षण मंत्री कै. यशवंतराव चव्हाण यांच्या शुभहस्ते परळी औष्णिक विद्युत केंद्राचा कोनशीला समारंभ झाला. परळी औष्णिक विद्युत केंद्रात १५ नोव्हेंबर १९७१ मध्ये ३० मेगावॅट क्षमतेचा पहिला संच कार्यान्वित करण्यात आला होता. तर १७ मे १९७२ रोजी दुसरा संच ३० मेगावॅटचा कार्यान्वित झाला होता . १० ऑक्टोबर १९८० मध्ये पहिला २१० मेगावॅटचा संच (संच क्रमांक ३) सुरू करण्यात आला होता.२६ मार्च १९८५ मध्ये २१० मेगावॅटचा संच (संच क्रमांक ४) कार्यान्वित झाला होता तर संच क्रमांक ५ हा ३१ डिसेंबर १९८५ मध्ये कार्यान्वित झाला होता. हे पाच ही संच चालू होते. तेव्हा भारत सरकारचा वीजनिर्मिती बद्दल महत्तम उत्पादकता पुरस्कार तसेच इंधन तेल बचतीचा पुरस्कार १९९८ पर्यंत प्राप्त झाले आहे विविध पुरस्कारांनी परळीचे औष्णिक विद्युत केंद्र गौरविण्यात आलेले आहे. तसेच सामाजिक वनीकरण महाराष्ट्र राज्य यांच्याकडून राख बंधाऱ्यावर वनराई उभी केल्याबद्दल वनश्री प्रथम पुरस्कार १९९५ मध्ये प्राप्त झाला होता. आज हे पाच संच बंद असून महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनीने हे संच लिलावात काढले आहे. तसेच राख बंधारा ही नष्ट झाला आहे.

**परळीची अर्थवाहिनी अशी औष्णिक वीज केंद्राची ओळख पुसट...**

औष्णिक वीज केंद्र हे परळीची अर्थवाहिनी म्हणून ओळखले जाते. या विद्युत केंद्रातील संच क्रमांक ९ ही मंजूर आहे परंतु त्याची उभारणी अद्याप करण्यात आलेली नाही.सध्या संच क्रमांक ६,७, व ८ हे तीन संच चालू आहेत. वीज निर्मितीसाठी लागणारा कोळसा रेल्वे ट्रॅकने वणी येथून येतो. खडका येथील धरणातून पाणीपुरवठा होतो. तीन संचातून वीज निर्मिती चालू आहे. हे तिन्ही संच अत्याधुनिक असून मनुष्यबळ कमी लागणारे संच आहेत. जुन्या औष्णिक विद्युत केंद्रात पाच संच चालू असताना मोठ्या प्रमाणात अधिकारी, कर्मचारी, कामगारवर्ग कार्यरत होता. त्यामुळे परळी बाजारपेठेत भरभराट निर्माण झाली होती. जुने संच बंद झाल्याचा परळीच्या बाजारपेठेवर मोठ्या परिणाम जाणू लागला आहे.एक प्रकारे हे संच बंद झाल्याने परळीची अर्थवाहिनी अशी औष्णिक वीज केंद्राची ओळखही हळूहळू पुसट होत आहे.

## नियोजित वीज प्रकल्प परळीतच उभारावा -ॲड.जीवनराव देशमुख

केंद्र सरकारने मंजूर केलेल्या परळी वैजनाथ येथील संच क्रमांक नऊच्या उभारणीबाबत शासन-प्रशासन स्तरावर नियोजित खोडसाळपणा करून परळी येथे मंजूर असलेला हा प्रकल्प उभाच राहू नये यासाठी वस्तुस्थिती सोडून कोणतीही कारणे समोर आणली जात आहेत. प्रशासनाकडून वस्तुस्थिती सोडून कारणे दाखवून हा प्रकल्प उभाच राहू नये असा प्रयत्न होत आहे. मात्र मंजूर असलेला औष्णिक विद्युत केंद्राचा संच क्रमांक नऊ हा प्रकल्प परळीतच उभारला गेला पाहिजे अशी मागणी



राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने शहराध्यक्ष ॲड.जीवनराव देशमुख यांनी थेट उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे करण्यात आली आहे. याबाबत देण्यात आलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, महाराष्ट्र राज्य मंत्री मंडळाची ४७ वी बैठक दिनांक १६.०९.२०२३ रोजी छत्रपती संभाजीनगर येथे झाली व या बैठकीत परळी वै. येथे वाढीव ६०० मे. वॅट विद्युत निर्मिती प्रकल्प उभारणीला मंजुरी दिली होती. मात्र आता परळी औष्णिक विद्युत केंद्राला पाण्याची उपलब्धता नसल्याने व कोळसा हाताळणी स्त्रोतापासून दूर असल्याने वहनासाठी खर्च येत असल्याने सदरचे नवीन संच उभारणे सद्यस्थितीत विचाराधीन नाही असे कळविले आहे.हे वस्तुस्थितीला धरून नाही. वास्तविक पाहता परळी तालुक्यातील पुर्ण

(उर्वरित पान ४ वर)


# पत्रकारितेचा वसा घेऊन साहित्यात देखील आपला ठसा उमटवणारे प्रदीप कुलकर्णी..

माजलगाव जिल्हा बीड येथून प्रकाशित होणाऱ्या साप्ताहिक माजलगाव परिसर व साप्ताहिक बडबड या वृत्तपत्रांचे संस्थापक संपादक प्रदीप कुलकर्णी यांना एस फोर सोल्युशन या संस्थेचा साहित्यरत्न हा पुरस्कार जाहीर झाला असून आज दिनांक ३० ऑगस्ट रोजी त्याचे वितरण पुणे येथील एस एम जोशी सभागृह या ठिकाणी समारंभ पूर्वक होणार आहे. प्रदीप कुलकर्णी यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल सर्वप्रथम त्यांचे हार्दिक अभिनंदन.

त्यांच्याबद्दल सांगावयाचे झाल्यास ते हाडाचे पत्रकार असून वाचन , लेखन हा त्यांचा मुख्य छंद आहे. त्यांनी अनेक कथा, कादंबऱ्या वाचल्या आहेत आणि त्यांनी स्वतः भरपूर असे लिखाण केले आहे . त्यांची निवांत नावाची पहिली कादंबरी १९८४ ला प्रकाशित झाली , ही कादंबरी जगदंबा प्रकाशन या संस्थेने प्रकाशित केली. या कादंबरीचा प्रकाशन समारंभ तत्कालीन शिक्षक आमदार डि के देशमुख यांच्या हस्ते सिरसाळा येथे संपन्न झाला होता.

कथा, कादंबरी, कविता वाचनाच्या छंदातून प्रदीप कुलकर्णी यांनी शिरसाळा येथे १९८१ ला विवेक वाचनालय स्थापन केले होते . त्यांचे विविध वृत्तपत्रात कथा व विविध विषयावरील लेख प्रकाशित झाले आहेत. अनेक दिवाळी अंकातून त्यांच्या कथा प्रकाशित झालेल्या आहेत . निवांत या कादंबरी नंतर त्यांनी मीनाक्षी या नावाची कादंबरी लिहिली. आणि ती पूर्ण केली . परंतु पुस्तक रूपाने पुढे ती प्रकाशित झाली नाही. त्यानंतर मला घटस्फोट हवाय, ओवाळणी या दोन कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या आणि त्याचे प्रकाशन माजलगाव परिसर च्या अंकातून क्रमशः करण्यात आले त्याचप्रमाणे ओवाळणी ही कादंबरी चिकू या तत्कालीन साप्ताहिक आतून क्रमशः प्रकाशित करण्यात आली होती. प्रदीप कुलकर्णी यांच्या साहित्याचा वाचक वर्ग खूप मोठ्या प्रमाणात असून २०२० पासून त्यांनी प्रतिलिपीवर लिखाण करायला सुरुवात केली आहे. त्यांच्या नऊ कादंबऱ्या प्रकाशित असून तीन कादंबऱ्यांचे प्रकाशन सुरू आहे. एकूण बारा कादंबऱ्या प्रतिलिपीवर ऑनलाइन वाचकांना वाचायला उपलब्ध आहेत. नुकतेच ''प्रेमात पडायचे होते पण'' ही कादंबरी पुस्तक रूपाने प्रतिलिपी प्रकाशन ने प्रकाशित केली आहे. या कादंबरीचे संपूर्ण महाराष्ट्रातील वाचकांनी स्वागत केले आहे.

प्रदीप कुलकर्णी यांनी आतापर्यंत २०० ते ३०० लघुकथा लिहिल्या असून त्यापैकी ११० लघुकथा प्रति लिपीवर प्रकाशित झाल्या आहेत.



यात काही लेखांचा देखील समावेश आहे. प्रतिलिपीच्या वतीने त्यांना तीन वेळा फेलोशिप प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे . प्रतिलिपीच्या स्पर्धा मधून ते सातत्याने सहभाग घेत असतात, त्याबद्दल त्यांना सहभाग प्रमाणपत्र देखील प्राप्त झाले आहे. साहित्य क्षेत्रात त्यांची खूप मोठी सेवा असून वृत्तपत्र क्षेत्रात देखील त्यांचे कार्य उल्लेखनीय आहे. माजलगाव परिसर च्या जन्मा आधी त्यांनी दैनिक झुंजार नेता, दैनिक चंपावती पत्र, दैनिक मराठवाडा या वृत्तपत्राचे शिरसाळा येथे वार्ताहर म्हणून काम केले आहे.

अत्यंत गरिबीची परिस्थिती असताना आणि कोणताही राजकीय किंवा सामाजिक वारसा नसताना प्रदीप कुलकर्णी यांनी स्वतःला घडविण्यात स्वतःचेच खूप मोठे असे योगदान दिलेले आहे. कोणाचे मार्गदर्शन नाही, कोणाचे सहकार्य नाही आणि तरीही त्यांनी आपण आपल्याला घडविले पाहिजे असे ध्येय मनाशी बाळगून ते सातत्याने परिस्थितीशी झगडत स्वतःला सिद्ध करत राहिले आणि १९८७ साली त्यांनी माजलगाव परिसर हे वृत्तपत्र माजलगाव येथे प्रकाशित करायला सुरुवात केली. त्यापूर्वी ते माजलगाव पत्रिका या तत्कालीन साप्ताहिकांमध्ये कार्यकारी संपादक म्हणून माजलगाव येथे रुजू झाले होते. या ठिकाणी त्यांना वृत्तपत्र चालवण्याचा चांगला अनुभव आला. आणि या अनुभवाच्या शिदोरीवर त्यांनी माजलगाव परिसर ची स्थापना केली. आणि आज या वृत्तपत्राचा वाचक वर्ग फार मोठ्या प्रमाणात आहे. माजलगाव परिसर चा दिवाळी अंक तर ते खूप असा आकर्षक प्रकाशित करत असतात. पत्रकारितेत त्यांचे खूप मोठे योगदान असून संघटनात्मक कार्यात देखील ते आघाडीवर आहेत. असोसिएशन ऑफ स्मॉल ॲंड मिडीयम न्यूज पेपर ऑफ इंडिया या राष्ट्रीय पातळीवरील संघटनेचे ते बीड जिल्हाध्यक्ष होते. तेव्हापासून ते या संघटनेत कार्यरत आहेत. आज ते या संघटनेचे राज्य अध्यक्ष आहेत. ते कोणतेही काम मनावर घेतले की पाठीमागे पाहायचे नाही पुढे चालायचे असा त्यांचा स्वभाव असल्याने संघटनेत देखील ते एक एक पाऊल पुढेच टाकत गेले. आज त्यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रामध्ये छोट्या वृत्तपत्रांची चांगली संघटना उभी राहिलेली दिसते.

पत्रकारितेत काम करताना त्यांनी साहित्याची खूप मोठी सेवा केली असून अनेक वाचक त्यांच्या साहित्याची नेहमी प्रतीक्षा करत असतात. प्रतिलिपीवर सहा लाख संख्येपेक्षा जास्त वाचक त्यांचे आहेत. या सर्व साहित्य सेवेचा आणि साहित्यातील योगदानाची दखल पुणे येथील एस फोर सोल्युशन या भारतामध्ये सुप्रसिद्ध असलेल्या एका प्रकाशन संस्थेने घेतली. आणि त्यांना २०२४ चा साहित्यरत्न पुरस्कार जाहीर केला. त्याचे वितरण आज दिनांक ३० ऑगस्ट रोजी एस एम जोशी सभागृह पत्रकार भावना जवळ पुणे येथे संपन्न होत आहे. प्रदीप कुलकर्णी यांच्या पत्रकारितेतील आणि साहित्यातील योगदानाबद्दल त्यांचे करावे तेवढे कौतुक कमी आहे . त्यांचे मनापासून खूप खूप अभिनंदन व पुढील वाटचालीसाठी त्यांना पुन्हा एकदा माझ्या हार्दिक शुभेच्छा.

**-दिगंबर सोळंके**
संपादक, साप्ताहिक लोक प्रचारक
माजलगाव जिल्हा बीड